ePaper

“सर्किट ब्रेकर बदला!” बराक ओबामांचा डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर जोरदार हल्ला



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 07 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

१,००१ दिव्यांतून शिवशंभूंच्या शौर्याचा जागर!

‘अजितदादा हयात असते तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या असत्या’; तटकरेंचा दावा

राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार?

महाईन्यूज । मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात चर्चेत आला आहे. अजित पवार हयात असते, तर १२ फेब्रुवारी रोजीच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे विलीनीकरण झाले असते, असा दावा प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला आहे. मात्र, त्यांच्या या विधानावर आमदार रोहित पवार यांनी आक्षेप घेत विलीनीकरणाची शक्यता नाकारणाऱ्या नेत्यांची भूमिका आता अचानक का बदलली, असा सवाल उपस्थित केला आहे.




राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल यांनी गुरुवारी रात्री मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी शरद पवार यांनी १० नोव्हेंबरनंतर एकत्र बसण्याबाबत सांगितल्याने विलीनीकरणाच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

सुनील तटकरे यांनी एका मुलाखतीत सांगितले की, अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाबाबत निश्चित चर्चा झाली होती. विलीनीकरणाची प्रक्रिया कशी पार पडणार, याची माहितीही अजित पवार यांनी दिली होती. त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीमुळे १२ फेब्रुवारीलाच दोन्ही पक्ष एकत्र आले असते. मात्र, २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाल्याने ही प्रक्रिया पुढे जाऊ शकली नाही.

तटकरे यांच्या विधानावर रोहित पवार यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. अजित पवार यांची शरद पवार आणि संपूर्ण पवार कुटुंबाला एकत्र आणण्याची भावनिक भूमिका होती. हे आम्ही सुरुवातीपासून सांगत होतो. मात्र, अजितदादांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांत विलीनीकरणाची चर्चा नाकारणारे सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल आता विलीनीकरण होणार होते, असे का सांगत आहेत? त्यांच्या या बदललेल्या भूमिकेमागे राजकीय कारणे किंवा पक्षातील अंतर्गत अडचणी असू शकतात, अशी शंकाही रोहित पवार यांनी व्यक्त केली.

जुलै २०२३ मध्ये अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधील मोठा गट घेऊन महायुतीत प्रवेश केल्याने पक्षात फूट पडली होती. मात्र, डिसेंबर २०२५ मध्ये शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अजित पवार यांनी त्यांची भेट घेतल्यानंतर दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. आता प्रफुल पटेल यांची शरद पवारांशी भेट आणि तटकरे यांच्या विधानामुळे या चर्चांना पुन्हा वेग आला आहे. दोन्ही राष्ट्रवादी खरोखरच एकत्र येणार की विलीनीकरणाचा मुद्दा राजकीय चर्चेपुरताच मर्यादित राहणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.



१२ फेब्रुवारीलाच विलीनीकरण होणार होते?

अजित पवार हयात असते तर १२ फेब्रुवारी २०२६ रोजी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे विलीनीकरण झाले असते, असा दावा सुनील तटकरे यांनी केला आहे. मात्र, ही प्रक्रिया प्रत्यक्षात कोणत्या राजकीय सूत्रानुसार पार पडणार होती, याबाबत अधिकृत तपशील समोर आलेला नाही. त्यामुळे तटकरेंच्या विधानानंतर विलीनीकरणाच्या चर्चेला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले आहे.

रोहित पवारांचा थेट सवाल

अजित पवार यांच्या निधनानंतर विलीनीकरणाची चर्चा नाकारणाऱ्या नेत्यांनी आता आपली भूमिका का बदलली? पक्षातील अंतर्गत राजकीय परिस्थितीमुळे हा बदल झाला आहे का? असे प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केले आहेत. त्यामुळे सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल या प्रश्नांना काय उत्तर देतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

विजय वडेट्टीवार काय म्हणाले?

“अजित पवारांच्या राष्ट्रवादीत मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे असं मला दिसत आहे. त्या पक्षात (अजित पवारांची राष्ट्रवादी) दोन गट पडल्याचं दिसत आहे. भारतीय जनता पक्ष असा पक्ष आहे, जो पक्ष भांडणे लावून स्वतःचा राजकीय स्वार्थ साधतो. त्यामुळे भाजपाला जुमलेबाजाचा पक्ष म्हटलं जातं”, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

मर्सिडीजची पुण्यात २०० कोटींची नवी गुंतवणूक!

मर्सिडीजची भारतातील गुंतवणूक ३,२०० कोटींवर, २० हजार जणांना रोजगार

महाईन्यूज । पुणे

जागतिक पातळीवरील मर्सिडीज-बेन्झ कंपनीने आता मोटार उत्पादनासाठी पुण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. जर्मनीतील ब्रेमेननंतर जगात मर्सिडीज-बेंझच्या नव्या इलेक्ट्रिक जीएलसी या आलिशान इलेक्ट्रिक मोटारीचे उत्पादन करणारे पुणे हे दुसरे केंद्र ठरले आहे. पुण्यातील चाकणमधील उत्पादन प्रकल्पातून या नव्या इलेक्ट्रिक मोटारीचे उत्पादन सुरू झाले आहे. मर्सिडीज-बेंझ इंडियाची भारतातील एकूण गुंतवणूक आता ३ हजार २०० कोटी रुपयांवर पोहोचली असून यातून सुमारे २० हजार जणांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झाला आहे.



मर्सिडीज-बेन्झ इंडियाने चालू वर्षात उत्पादन क्षमता, नवीन वाहनांच्या उत्पादनाची तयारी आणि उत्पादन प्रक्रियेच्या डिजिटायझेशनसाठी आणखी २०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. मर्सिडीज-बेंझ इंडियाची भारतातील एकूण गुंतवणूक आता ३ हजार २०० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. भारतातील अलिशान मोटारींच्या उत्पादक कंपन्यांमध्ये ही सर्वाधिक गुंतवणूक आहे. पुण्यातील उत्पादन प्रकल्पाचे जागतिक उत्पादन साखळीतील महत्त्व या नव्या वाहनाच्या उत्पादनामुळे अधोरेखित झाले आहे. या प्रकल्पातून सुमारे १ हजार २०० जणांना प्रत्यक्ष रोजगार मिळाला असून पुरवठा साखळीत १८ हजारांहून अधिक रोजगार निर्माण झाले आहेत.

इलेक्ट्रिक जीएलसी ही मर्सिडीज-बेंझ इंडियाच्या नव्या पिढीतील इलेक्ट्रिक वाहन आर्किटेक्चरवर आधारित पहिली स्थानिक पातळीवर उत्पादित मोटार आहे. तसेच कंपनीच्या नव्या मर्सिडीज-बेन्झ ऑपरेटिंग सिस्टीम या तंत्रज्ञानाचा समावेश असलेले भारतात उत्पादित होणारे हे पहिले वाहन ठरले आहे. या वाहनाचे उत्पादन पुण्यातील प्रकल्पात सुरू होणे हे कंपनीच्या जागतिक उत्पादन धोरणात पुण्याला मिळालेल्या महत्त्वाचे द्योतक आहे. जर्मनीतील ब्रेमेननंतर पुण्याला या वाहनाच्या उत्पादनासाठी निवडण्यात आले आहे.

मर्सिडीज-बेन्झने भारतात आतापर्यंत २.४ लाखांहून अधिक वाहनांची विक्री केली आहे. आलिशान वाहन क्षेत्रात कंपनीची ही मोठी बाजारपेठ असून, भारतातील उत्पादन आणि ग्राहकवर्गाच्या वाढत्या महत्त्वामुळे कंपनीकडून उत्पादन सुविधांमध्ये सातत्याने गुंतवणूक केली जात आहे. नव्या इलेक्ट्रिक जीएलसी मोटारीची एक्स-शोरूम किंमत ७८.५० लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. नोव्हेंबरच्या मध्यापासून ग्राहकांना ती उपलब्ध होणार होणार आहेत.

रोजगार अन् स्थानिक उद्योगांना संधी

पुण्यातील प्रकल्पात नव्या इलेक्ट्रिक वाहनाचे उत्पादन सुरू झाल्याने वाहन उत्पादनाशी संबंधित पूरक उद्योगांनाही संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेषतः वाहनांच्या सुट्या भागाचे उत्पादक, इलेक्ट्रॉनिक्स, बॅटरी व्यवस्थापन, इलेक्ट्रिक ड्राइव्हट्रेन, सॉफ्टवेअर आणि औद्योगिक ऑटोमेशन क्षेत्रातील कंपन्यांसाठी नव्या व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. चाकण, तळेगाव आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील वाहन उद्योगाच्या औद्योगिक परिसंस्थेला या घडामोडीचा फायदा होऊ शकतो. कुशल तंत्रज्ञ, उत्पादन अभियंते, गुणवत्ता नियंत्रण, रोबोटिक्स आणि डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील मनुष्यबळाची मागणी वाढण्याचीही शक्यता आहे.

पुणे महापालिकेतील १७ हजार मुले शिकणार 'सीबीएसई' अभ्यासक्रम!

महाईन्यूज । पुणे

महापालिकेच्या आठ शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा (सीबीएसई) अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. त्यामुळे महापालिकेच्या आठ शाळांत 'सीबीएसई'चा अभ्यासक्रम शिकविला जाणार आहे. या बाबतचे ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) नुकतेच राज्य सरकारकडून महापालिकेला देण्यात आले आहे.



पुणे शहरातील १७ हजार विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. महापालिकेच्या शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. महापालिकेच्या काही शाळा 'सीबीएसई' करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतला होता. स्थायी समितीच्या अर्थसंकल्पातदेखील सीबीएसई अभ्यासक्रमाच्या शाळा सुरू करण्यासाठी तरतूद उपलब्ध करून देण्यात आली होती.

महापालिका प्रशासनाने 'सीबीएसई'कडे प्रस्ताव पाठवून 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याची मागणी केली होती. आठ शाळांसाठी सध्या परवानगी मिळाली असल्याची माहिती महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी दिली. सीबीएसई अभ्यासक्रम शिकविण्यासाठी एनओसी मिळाल्याने महापालिकेचा मार्ग मोकळा झाला आहे. ही परवानगी मिळाल्याने येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून आठ शाळा सीबीएसईच्या सुरू केल्या जाणार आहेत.

पुणे शहरातील इतर खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांप्रमाणेच महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी देखील स्पर्धात्मक वातावरणामध्ये टिकून राहावेत, यासाठी महापालिका प्रशासनाकडून गेल्या काही वर्षापासून प्रयत्न सुरू आहेत. मॉडेल स्कूल अंतर्गत शाळांचा दर्जा सुधारण्याबरोबरच विद्यार्थ्यांमधील गुणवत्तावाढीवरदेखील वेगवेगळ्या पद्धतीने भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महापालिकेकडून प्रयत्न केले जात आहेत.

या संदर्भात महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये येणाऱ्या २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून या शाळांमध्ये वर्गटप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच, यासाठी शिक्षक भरती, शैक्षणिक धोरण, पायाभूत सुविधा आणि शाळा व्यवस्थापन यांचाही आढावा घेण्यात आला.

या आठ शाळांमध्ये काम करण्याची महापालिकेकडे कार्यरत असलेल्या ज्या शिक्षकांची इच्छा आहे. त्यांच्याकडून माहिती घेतली जाणार आहे. त्यांच्याशी चर्चा करून त्यांची गुणवत्ता तपासून त्यानंतर या शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. या शाळांमध्ये आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही कौर यांनी सांगितले.

महापालिकेच्या 'या' आठ शाळा 'सीबीएसई'

- डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम शाळा, कर्वेनगर,
- ६२ बी शाळा, प्रभाग क्रमांक १८, वानवडी
- रामचंद्र बनकर शाळा, हडपसर-मांजरी
- लहुजी साळवे शाळा, येरवडा
- ८३ बी, हडपसर-मांजरी
- १०२ जी, धानोरी
- २०३ बी, वडगाव बुद्रुक
- नवीन शाळा, कोंढवा.

१,००१ दिव्यांतून शिवशंभूंच्या शौर्याचा जागर!

हेल्प फाउंडेशनचा अनोखा दीपोत्सव; महेश लांडगे यांच्या संकल्पनेला नवी दिशा

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा जगातील सर्वात उंच पुतळा अर्थात 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' उभारण्यामागे केवळ भव्य स्मारक निर्माण करण्याची संकल्पना नव्हती, तर छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार, शौर्य, स्वाभिमान आणि स्वराज्यनिष्ठा भावी पिढ्यांच्या मनामनांत रुजवण्याचा व्यापक उद्देश होता. आज 'पहिला दिवा माझ्या राजासाठी' या दीपोत्सवाच्या माध्यमातून त्या संकल्पनेला खऱ्या अर्थाने सुरुवात झाल्याचे मनस्वी समाधान वाटते, अशा भावना आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.



दिवाळीच्या मंगलमय पर्वाच्या पार्श्वभूमीवर हेल्प फाउंडेशनच्या वतीने मोशी-बोऱ्हाडेवाडी येथील 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' परिसरात 'दीप उत्सव सोहळा २०२६' अंतर्गत 'पहिला दिवा माझ्या राजासाठी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या चरणी १००१ दिवे प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. दिव्यांच्या प्रकाशाने उजळलेल्या स्मारक परिसरात शिवशंभूंच्या पराक्रमाचा, त्यागाचा आणि स्वराज्यनिष्ठेचा जागर करण्यात आला. या उपक्रमातून ऐतिहासिक वारशाचे जतन आणि नव्या पिढीमध्ये स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून सुमारे १४० फूट उंचीच्या या पुतळ्याची निर्मिती जागतिक कीर्तीचे शिल्पकार स्वर्गीय राम सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, धर्मनिष्ठा आणि स्वराज्यासाठीचे बलिदान पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने या स्मारकाची उभारणी करण्यात आली आहे. जगातील सर्वात उंच छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा म्हणून या स्मारकाचा गौरव करण्यात येतो.

या स्मारक परिसरात ऐतिहासिक 'शंभूसृष्टी' विकसित करण्याची संकल्पना आहे. त्यामध्ये सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्यासह स्वराज्याच्या इतिहासातील सरदार-मावळ्यांचे पुतळे, ऐतिहासिक प्रसंग दर्शविणारी शिल्पे, म्युरल्स, ओपन एअर थिएटर आणि आधुनिक दृकश्राव्य सुविधांचा समावेश प्रस्तावित आहे. त्यामुळे हे स्मारक केवळ पर्यटनस्थळ न राहता शिवकालीन इतिहास, संस्कृती आणि स्वराज्याच्या विचारांचे प्रेरणाकेंद्र व्हावे, असा उद्देश आहे.

हिंदूभूषण स्मारक ट्रस्टच्या माध्यमातून या स्मारकाच्या अनुषंगाने विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांना चालना दिली जात आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाचा प्रसार, शिवशंभूंच्या विचारांची जनजागृती आणि तरुण पिढीला स्वराज्याच्या प्रेरणादायी इतिहासाशी जोडण्याच्या दृष्टीने उपक्रम राबवले जात आहेत. सामूहिक मानवंदना, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ऐतिहासिक वारशाचा जागर यांमधून स्मारकाच्या मूळ संकल्पनेला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न होत आहे.

> "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा जगातील सर्वात उंच पुतळा उभारण्याचा संकल्प केला, तेव्हा डोळ्यांसमोर केवळ एक भव्य वास्तू नव्हती. शिवशंभूंचा जाज्वल्य इतिहास, त्यांचे शौर्य, त्याग आणि स्वराज्यनिष्ठेचे विचार भावी पिढ्यांच्या मनामनांत रुजवण्याचे स्वप्न होते. आज हेल्प फाउंडेशनच्या वतीने 'पहिला दिवा माझ्या राजासाठी' या उपक्रमातून १००१ दिव्यांची मानवंदना देण्यात आली. या निमित्ताने त्या संकल्पनेला खऱ्या अर्थाने सुरुवात झाल्याचे समाधान वाटते. पुतळ्याची उंची जग पाहील; मात्र शिवशंभूंच्या विचारांची उंची भावी पिढ्यांच्या कर्तृत्वातून दिसली पाहिजे. दुसरा दिवा माझ्या दुष्काळग्रस्त परिस्थितीत लढणाऱ्या शेतकऱ्यासाठी आणि बळीराजासाठी प्रज्वलित करण्याचा आमचा संकल्प आहे."
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.

पवना नदीतून पाण्याची लूट; विहिरीत साठवून टँकरने विक्री!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये पाणीकपातीचे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जात असतानाच दुसरीकडे पवना नदीपात्रातून बेकायदा पाणीउपसा करून त्याची टँकरद्वारे विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रावेत परिसरात नदीतील पाणी पाइपलाइनद्वारे विहिरीत साठवून टँकरने विकले जात असल्याचे जलसंपदा विभागाच्या पाहणीत उघड झाले. या प्रकाराची गंभीर दखल घेत विभागाने नदीपात्रातील सर्व अनधिकृत पाणीउपसे चार दिवसांत बंद करण्याचा अल्टिमेटम दिला आहे. अन्यथा संबंधित बांधकाम व्यावसायिक आणि टँकरचालकांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



दुष्काळी परिस्थितीमुळे उपलब्ध पाण्याचे नियोजन करणे प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरत आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना पाणीकपातीचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत पवना नदीतील पाण्याचा अनधिकृत वापर करून त्याची व्यावसायिक विक्री होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होण्याची शक्यता आहे.

जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांच्या नेतृत्वाखालील पथकाने रावेत परिसरात पाहणी केली. त्यावेळी एका शेतामध्ये नदीपात्रातून पाइपलाइन टाकून पाणी उपसले जात असल्याचे आढळले. ही पाइपलाइन थेट विहिरीला जोडण्यात आली होती. नदीतून उपसलेले पाणी विहिरीत साठवून त्यातून टँकर भरले जात होते. त्यानंतर हे पाणी विविध ठिकाणी विक्रीसाठी पाठविले जात असल्याचे निदर्शनास आले.

पथकाने संबंधित ठिकाणी कारवाई करून पाणीउपशाची यंत्रणा हटविण्याच्या सूचना दिल्या. तसेच टँकर भरण्यासाठी उभारलेली यंत्रणाही काढून घेण्यास सांगितले. याशिवाय रावेत बंधाऱ्यापासून पवना धरणाच्या दिशेने नदीपात्रात अनेक ठिकाणी अशाच प्रकारे अनधिकृत पाणीउपसा होत असल्याची माहिती विभागाला मिळाली आहे.

त्यामुळे संपूर्ण नदीपात्राची तपासणी करून बेकायदा पाणीउपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. संबंधितांना चार दिवसांची मुदत देण्यात आली असून, या कालावधीत अनधिकृत उपसे बंद न केल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

या कारवाईत उपअभियंता माणिक शिंदे, शाखाधिकारी अनिकेत पाटील यांच्यासह जलसंपदा विभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान, एकीकडे नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन आणि दुसरीकडे नदीपात्रातून पाण्याची व्यावसायिक चोरी, या विसंगतीमुळे प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष लागले आहे.

> "पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये पाणीकपात लागू असताना पवना नदीपात्रातून बेकायदा पाणीउपसा करून टँकरद्वारे विक्री होत असल्याचे आढळले आहे. रावेत परिसरात पथकासह पाहणी करून कारवाई केली आहे. रावेत बंधाऱ्यापासून पवना धरणापर्यंतचे सर्व बेकायदा पाणीउपसे बंद करण्यासाठी चार दिवसांची मुदत दिली आहे. त्यानंतरही पाणीचोरी सुरू राहिल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील."
>
> - किरण देशमुख, कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

अग्निवीरांच्या सेवेला मुदतवाढ; प्रश्न मात्र कायम



भूमिका

अग्निपथ योजनेतील अग्निवीरांच्या सेवाकालात दोन वर्षांची वाढ करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. चार वर्षांच्या मर्यादित सेवेनंतर भवितव्याची चिंता असलेल्या हजारो तरुणांना या निर्णयामुळे काहीसा दिलासा मिळणार आहे. मात्र, हा बदल म्हणजे अग्निवीरांच्या सर्व समस्यांवरील उपाय नव्हे.

देशाच्या संरक्षणव्यवस्थेतील मनुष्यबळाची गरज, जवानांच्या सेवासुरक्षेचा प्रश्न आणि तरुणांच्या भविष्याची हमी या बाबींकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची आवश्यकता आहे.

जून २०२२ मध्ये सुरू करण्यात आलेल्या अग्निपथ योजनेनुसार तरुणांना चार वर्षांसाठी सैन्यात भरती केले जाते. त्यानंतर एकूण जवानांपैकी केवळ २५ टक्के जवानांना नियमित सेवेत सामावून घेण्याची तरतूद होती. उर्वरित ७५ टक्के जवानांना सेवामुक्त व्हावे लागत होते. त्यामुळे चार वर्षांनंतर रोजगाराचे काय, हा प्रश्न सुरुवातीपासूनच उपस्थित केला जात होता. आता तिन्ही सैन्यदलांतील अग्निवीरांचा सेवाकाल सहा वर्षांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच नियमित सेवेत सामावून घेण्याची संधीही अधिक व्यापक करण्यात आली आहे. त्यामुळे अग्निवीरांच्या भवितव्याबाबत निर्माण झालेली अनिश्चितता काही प्रमाणात कमी होऊ शकते.

देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या सेवेला केवळ कंत्राटी नोकरीच्या चौकटीत बसविता येणार नाही. सीमेवर प्रतिकूल हवामानात, कठीण परिस्थितीत आणि जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांचे योगदान अनमोल असते. त्यांच्या त्यागाला प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि योग्य सन्मान मिळणे आवश्यक आहे. नियमित सैनिक आणि अग्निवीर यांच्यातील वेतन, निवृत्तिविषयक लाभ, सेवासुरक्षा तसेच हौतात्म्यानंतर कुटुंबीयांना मिळणाऱ्या मदतीतील तफावत दूर करण्यासाठीही सरकारने गांभीर्याने विचार करायला हवा.

अग्निपथ योजनेविषयी आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे चार किंवा सहा वर्षांनंतर सेवेतून बाहेर पडणाऱ्या तरुणांच्या पुनर्वसनाचा. सैनिकी प्रशिक्षण घेतलेल्या तरुणांना खासगी उद्योग, सुरक्षा क्षेत्र आणि सरकारी सेवांमध्ये प्राधान्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. केवळ आश्वासने देऊन चालणार नाही, तर त्यासाठी ठोस धोरण आणि प्रभावी अंमलबजावणी हवी. दुसरीकडे, भारतीय सैन्यदलांमध्ये जवानांची दीड लाखांहून अधिक पदे रिक्त असल्याचा प्रश्नही दुर्लक्षित करता येणार नाही. चीन आणि पाकिस्तानसारख्या शेजारी देशांकडून निर्माण होणारी आव्हाने, सागरी सीमांची सुरक्षा आणि सायबर युद्धाचे वाढते धोके लक्षात घेता संरक्षणव्यवस्था अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आणि नियमित भरती प्रक्रियेला गती देणे महत्त्वाचे आहे.

अग्निवीरांच्या सेवाकालात वाढ करण्याचा निर्णय हा योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. मात्र, सैनिकांच्या भविष्याची सुरक्षितता आणि देशाच्या संरक्षणाची भक्कम तयारी या दोन्ही गोष्टी एकत्र साध्य झाल्या पाहिजेत. जवानांचे मनोबल उंचावणे, त्यांना सन्मानाची वागणूक देणे आणि त्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षित भविष्याची हमी देणे ही सरकारची जबाबदारी आहे. अग्निपथ योजनेतील बदल स्वागतार्ह असला, तरी संरक्षणव्यवस्थेतील व्यापक सुधारणांसाठी अजून बरेच काही करणे आवश्यक आहे. कारण देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांचे भविष्य सुरक्षित असेल, तरच देशाची संरक्षणसिद्धता अधिक मजबूत होईल.

प्रासंगिक »

तत्त्वांची किंमत

एका गावात माधव नावाचा कुंभार राहत होता. त्याची मातीची भांडी दूरवर प्रसिद्ध होती. एकदा गावातील व्यापाऱ्याने त्याला मोठी ऑर्डर दिली. मात्र, त्यासाठी कमी दर्जाची माती वापरण्याचा सल्ला दिला.

त्यामुळे खर्च कमी होऊन जास्त नफा मिळणार होता. माधवसमोर मोठा प्रश्न उभा राहिला.ऑर्डर नाकारली तर आर्थिक नुकसान होणार होते आणि स्वीकारली तर भांड्यांचा दर्जा घसरणार होता. त्याने व्यापाऱ्याला स्पष्ट सांगितले, "मी कमी किमतीत भांडी देऊ शकतो; पण त्यांच्या गुणवत्तेशी तडजोड करणार नाही."

व्यापारी रागावून निघून गेला. काही दिवसांनी त्याने दुसऱ्या कुंभाराकडून भांडी बनवून घेतली. मात्र, ती लवकरच फुटू लागली. ग्राहकांनी तक्रारी केल्यानंतर त्याचे मोठे नुकसान झाले.

ही बातमी समजल्यानंतर व्यापारी पुन्हा माधवकडे आला आणि त्याला मोठी ऑर्डर दिली. माधवने ती आनंदाने स्वीकारली.

- तात्पर्य : तात्पुरत्या फायद्यापेक्षा आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहणे अधिक महत्त्वाचे असते.

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचा कणा मानल्या जाणाऱ्या गोकुळ दूध संघाच्या सत्तासंघर्षाने आता नवे वळण घेतले आहे.

गोकुळच्या लोण्यावर राजकीय डोळा!

संचालक मंडळाच्या निवडणुकीत १३ विरुद्ध १२ असा कौल मिळाल्यानंतर अध्यक्ष निवडीवरून निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी राज्य सरकारने सहकारी संस्था अधिनियमात दुरुस्ती केली. या दुरुस्तीमुळे सरकारला गोकुळच्या संचालक मंडळावर चार मतदानाचा अधिकार असलेले अशासकीय सदस्य आणि एका शासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, या निर्णयामुळे सहकाराच्या स्वायत्ततेचा आणि लोकशाही प्रक्रियेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सहकारी संस्थांचा कारभार हा सदस्यांच्या सहभागातून आणि त्यांच्या मतदानातून चालणे अपेक्षित असते. गोकुळच्या निवडणुकीत साडेपाच लाख दूध उत्पादकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्राथमिक दूध संस्थांनी मतदान करून २५ संचालक निवडून दिले. त्यामध्ये समविचारी आघाडीला १३, तर महायुतीला १२ जागा मिळाल्या. मात्र, अध्यक्ष निवडीसाठी आवश्यक गणपूर्तीअभावी प्रक्रिया रखडली. या परिस्थितीत सरकारने कायद्यात बदल करून हस्तक्षेपाचा



मार्ग स्वीकारला. सरकारच्या मते, मोठ्या सहकारी संस्थांचे आर्थिक हित, पारदर्शकता आणि प्रशासकीय स्थैर्य राखण्यासाठी ही तरतूद आवश्यक आहे. मात्र, निवडणुकीत बहुमत मिळवता न आल्याने सरकारनियुक्त संचालकांच्या माध्यमातून सत्तेचे समीकरण बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा विरोधकांचा आरोप आहे.

सरकारी हस्तक्षेपाचा उद्देश संस्थेचे हित जपणे हा असेल, तर त्याचे स्वागत करता येईल. मात्र, त्यातून निवडून आलेल्या संचालकांच्या अधिकारांवर मर्यादा येत असतील, तर त्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. ९७ व्या घटनादुरुस्तीने सहकारी संस्थांच्या स्वायत्तता, लोकशाही नियंत्रण आणि व्यावसायिक व्यवस्थापनाला महत्त्व दिले आहे. त्यामुळे सरकारचे प्रतिनिधित्व आणि संस्थेचे स्वतंत्र निर्णयस्वातंत्र्य यांच्यात योग्य समतोल राखणे आवश्यक आहे. गोकुळ हा केवळ दूध संकलन आणि विक्री करणारा संघ नाही. लाखो दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाचा आणि आर्थिक आधाराचा तो महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे त्याच्या सत्तासंघर्षात राजकीय पक्षांनी स्वार्थपिक्षा शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य द्यायला हवे. अमूलच्या स्पर्धेपासून ते बाजारपेठेतील आव्हानांपर्यंत अनेक प्रश्न संघासमोर आहेत. अशा वेळी अंतर्गत राजकारणात संस्थेचा वेळ आणि ऊर्जा खर्च होणे दुर्दैवी आहे.

सरकारच्या निर्णयाची कायदेशीर वैधता न्यायालयीन कसोटीवर तपासली जाणेही महत्त्वाचे ठरेल. सहकार वाचविण्याच्या नावाखाली राजकीय नियंत्रण वाढता कामा नये. कारण सहकाराचा खरा आधार हा शासनाचा हस्तक्षेप नसून सभासदांचा विश्वास आणि लोकशाही सहभाग आहे. 'गोकुळ'मधील लोण्यावर कोणाचा डोळा आहे, यापेक्षा दूध उत्पादकांच्या घामाचे मोल जपले जाते की नाही, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

।। अभंगवाणी ।।



देती घेती परज गेली ।
घर खालीं करूनियां ॥१॥

धांवणियाचे न पडे हातीं ।
खादली राती काळोखी ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

गोकुळच्या अध्यक्षपदाचा पेच सुटणार?

हसन मुश्रीफांनी सतेज पाटलांना दिली खुली ऑफर; राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

महाईन्यूज । कोल्हापुर

कोल्हापुरातील जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकूळच्या अध्यक्ष पदावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. गोकुळमध्ये सत्तास्थापनेसाठी १४ चा कोरम कोणाकडेच नसल्याने भाजपाने गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळावर ५ शासननियुक्त संचालकांची नियुक्ती कऱण्यासह त्यापैकी चार जणांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे हातातोंडाशी आलेला अध्यक्षपदाचा घास सतेज पाटलांच्या हातून निसटून जात असल्याचं चित्र निर्माण झालं आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांनी सतेज पाटलांना थेट ऑफर देऊ केली आहे. आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.



माजी सरन्यायाधीशांनी दिला होता कायदेशीर सल्ला

गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचमधील वकील ॲड. श्रीकृष्ण गणबावले यांनी गोकुळच्या १३ बहुमतातील निर्वाचित संचालकांच्या वतीने माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्याकडून कायदेशीर सल्ला मागवला होता. ३ नोव्हेंबर रोजी त्यांनी त्यावर अभिप्राय दिला आहे.त्यावर बी.आर.गवई म्हणाले, "सहकारातील कलम ७३ अअअ आणि २७(९) नुसार स्वीकृत व शासकीय नामनिर्देशित संचालकांना अध्यक्ष किंवा इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार नाही. बहुमताचा कौल नाकारण्यासाठी अध्यादेशाद्वारे हा अधिकार देणे हे राजकीय हेतूने प्रेरित असून लोकशाही मूल्यांच्या विरोधी आहे".

हसन मुश्रीफ म्हणाले, काँग्रेसच्या १३ जागा निवडून आल्या, महायुतीच्या १२ जागा निवडून आल्या. गोकुळ हा एकमेव सहकारी संघ जिथे १४ चा कोरम आहे. त्यामुळे त्यांना एक कमी जागा पडतेय आणि आम्हाला २ कमी पडत आहेत. निवडणूक नियमामध्ये तीन मिटिंगमध्ये कोरम झाला नाही ,तर प्रशासक नेमतात. प्रशासक नेमला तर निवडणूक होणार. निवडून आलेल्या लोकांना जर सत्ता द्यायची असेल तर लोकशाही टिकवण्यासाठी आमच्याकडे दुसरा मार्ग नव्हता. आमच्या पक्षाला विरोधी पक्षात बसवण्याचा कौल मिळाला आहे. कायद्यात सरळ १४ चा कोरम असल्याने डेडलॉक तयार झालाय. बहुमत मिळालं असलं तरीही सत्तास्थापनेचा आकडा गाठलेला नाही. त्या २५ जणांच्या हातात सत्ता देण्याकरता, कारभार सुरू होण्याकरता घेतलेला हा निर्णय आहे." या ऑफरवर आता सतेज पाटील काय निर्णय घेतात, ते फॉर्म्युला देतात का हे पाहावं लागणार आहे.

सतेज पाटलांना अध्यक्षपद देणार का? असा प्रश्नही हसन मुश्रीफ यांना विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, "अध्यक्षपदासाठीचा फॉर्म्युला सतेज पाटलांनी द्यायला हवा. निवडणूक झाल्यावर त्यांनी मुख्यमंत्र्यांना, तिन्ही मंत्र्यांना, दहा आमदारांना दोन हातांना बांधून काय काय पोस्टर लावले? मुख्यमंत्र्यांची कोल्हापुरात बदनामी केली. निवडणुकीत जय पराजय मिळत असतो. पण मला जिव्हारी गोष्ट लागली ती म्हणजे मुलाचा प्रचार जातीवादी करण्यात आला."

सोने-चांदी वर्खाच्या मिठाईवर मुंढेंच्या अन्न आणि औषध प्रशासनाची करडी नजर

महाईन्यूज । मुंबई

अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सोन्याचा वर्ख आणि चांदीचा वर्ख असलेल्या मिठायांचा दर्जा तपासण्याचे आदेश तातडीने दिले आहेत. अमरावती जिल्ह्यातील २४ हजार रूपये किलोची सोन्याचा वर्ख असलेली मिठाई चर्चेत आली. त्यानंतर सोने आणि चांदी यांचा वर्ख असलेल्या मिठायांबाबत ग्राहकांच्या काही तक्रारीही आल्या, ज्यानंतर तुकाराम मुंढेंनी राज्यभरातल्या या मिठायांवर करडी नजर ठेवण्याचे निर्देश अन्न आणि औषध प्रशासन विभागाला दिले आहेत.





सोन्याचा वर्ख खाणं हे काही आरोग्यासाठी हानिकारक नाही. पण दिवाळीच्या तोंडावर काही हलवाई आणि मिठाई व्यावसायिक चुकीचे दावे करत आहेत. यासंदर्भातल्या तक्रारी आमच्यापर्यंत आल्याने आम्ही अशा मिठाईबाबत तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच तुकाराम मुंढे असंही म्हणाले की चांदीचा वर्ख लावून जी मिठाई विकली जाते त्यातल्या वर्खावरची चांदी ही खरी नसते. जर तुम्ही तो वर्ख बोटांनी घासून पाहिलात तर तो गायब होतो. काही मिठायांमध्ये बनावट ॲल्युमिनिअमचाही वापर होतो. आमच्याकडे तक्रारी आल्याने आम्ही या मिठायांच्या दर्जाबाबत तपासणी करण्याचं ठरवलं आहे.

काही दिवसांपूर्वीच मुंबईतल्या भांडुप या ठिकाणी एका लग्न समारंभात २५ लोकांना अन्नातून विषबाधा बाधा झाली होती. नविवाहित दाम्पत्यासह अनेक जण आजारी झाले होते. यानंतर कारवाई करत FDA ने दोन केटरर्सचे परवाने स्थगित केले. त्यात मिठाई विक्रेताही होता. ज्यानंतर तुकाराम मुंढे यांनी नोंदणी असलेल्या केटरर्सनाच लग्नसराईतील जेवणाच्या ऑर्डर्स द्या असं आवाहन केलं होतं. आता दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सोन्याच्या वर्खाची मिठाई चर्चेत आली. यानंतर सोने आणि चांदी यांचा वर्ख असलेल्या मिठायांची तपासणी केली जाणार आहे असं तुकाराम मुंढेंनी स्पष्ट केलं आहे.

प्रदूषणाने दिल्ली गुदमरली; AQI ४०० पार!

वाढत्या वायुप्रदूषणावर सर्वोच्च न्यायालयाची चिंता; प्रशासनाला विचारला जाब

महाईन्यूज । नवी दिल्ली

दिल्लीतील वाढत्या वायुप्रदूषणावर सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी चिंता व्यक्त केली. "आपण सतत चर्चा करत आहोत, पण हवेचा गुणवत्ता निर्देशांक आधीच ४०० वर पोहोचला आहे," अशा शब्दांत सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी प्रशासनाला जाब विचारला. दिल्ली-एनसीआरमधील प्रदूषणासंदर्भातील सुनावणीदरम्यान त्यांनी प्रदूषण नियंत्रणासाठी कोणती पावले उचलली जात आहेत, याची माहिती मागितली. तसेच एक्यूआय वाढल्यास सर्व वयोगटांतील विद्यार्थ्यांसाठी शाळांमधील प्रत्यक्ष वर्ग बंद ठेवण्याच्या मागणीवर तज्ज्ञांचे मत विचारात घेतले जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.



सुनावणीदरम्यान न्यायालयाला मदत करणाऱ्या ज्येष्ठ वकील अपराजिता सिंह यांनी दिल्लीतील प्रदूषणाची गंभीर परिस्थिती मांडली. ५ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील प्रदूषणात पराली जाळण्याचा वाटा १४ टक्के असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, स्थानिक प्रदूषण आणि वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदूषणावरही लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

दिल्ली आणि एनसीआरमधील रस्त्यांवर वाहनांची मोठी गर्दी असल्याचे सांगत सरन्यायाधीशांनी वाहनांमधून होणारे प्रदूषण ही प्रमुख समस्या असल्याचे अधोरेखित केले. सार्वजनिक वाहतुकीची उपलब्धता वाढवण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. टोलनाके आणि दिल्लीच्या सीमा यांवर वाहने बराच वेळ उभी राहत असल्याने प्रदूषण वाढत असल्याचा मुद्दाही सुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आला. या संदर्भात न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्देशांची पूर्ण अंमलबजावणी झालेली नसल्याचे अतिरिक्त सॉलिसीटर जनरल यांनी मान्य केले.

पराली जाळण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक प्रोत्साहन देण्याची गरज सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली आहे. पराली खरेदीचा दर आधीच जाहीर करावा आणि ग्रामपंचायतींना पराली गोळा करण्याचे यंत्र द्यावे, अशी सूचना न्यायालयाने केली. मात्र, महागड्या यंत्रांचा इंधन खर्च आणि लहान शेतात त्यांचा वापर करण्याची अडचण वकिलांनी मांडली. पराली जाळण्याऐवजी तिच्या आर्थिक उपयोगाबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याची गरजही न्यायालयाने यावेळी अधोरेखित केली.

शाळा बंद करण्याबाबत तज्ज्ञांचे मत महत्त्वाचे

दिल्लीतील प्रदूषणाचा मुलांच्या आरोग्यावर होणारा दुष्परिणाम लक्षात घेता शाळा बंद ठेवण्याच्या मागणीवर बालरोग व आरोग्य तज्ज्ञांचे मत घेणे गरजेचे असल्याचे न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी स्पष्ट केले. ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध करून देता येईल; मात्र त्याचा दर्जा आणि प्रत्यक्ष वर्गांमधील शिक्षणाची गुणवत्ता यांचाही विचार करावा लागेल, असे न्यायालयाने नमूद केले. वैयक्तिक अनुभवांऐवजी वैद्यकीय संशोधनावर आधारित निर्णय घेतला जावा, असे सांगत न्यायालयाने तोपर्यंत ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन अंतर्गत लागू असलेल्या नियमांचे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

AQI ५०० पार जाण्याचा अंदाज

दरम्यान, दिवाळीच्या काळात दिल्लीतील हवेची गुणवत्ता आणखी खालावण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. पीटीआयच्या वृत्तानुसार, दिल्लीचा एक्यूआय ५०० च्या पुढे जाऊन हवा 'अत्यंत गंभीर' श्रेणीत पोहोचू शकते. वाऱ्याचा वेग कमी झाल्यास प्रदूषित घटक वातावरणातच अडकून राहण्याची शक्यता असून, दिवाळीनंतरही प्रदूषणात वाढ होऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

"मला कदाचित उरलेला इराण उद्ध्वस्त करावा लागेल" ट्रम्प यांची थेट धमकी

महाईन्यूज । अमेरिका

अमेरिकेत मध्यावधी निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतरही राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला इशारा देणं थांबवलेलं नाही. त्यांनी आता पुन्हा इराणला लक्ष्य केलं असून इराणविरोधात अमेरिका पुढील कारवाई करू शकते, असं डोनाल्ड ट्रम्प म्हणाले आहेत. तसंच, इराणने आणखी विनाश टाळण्याचे संकेतही दिले आहेत. अमेरिकेच्या मंजुरीशिवाय तेहरान आपल्या अणु कार्यक्रमात पुढे जाऊ शकत नाही, असा दावाही त्यांनी केला.



ओव्हल ऑफिसमध्ये पत्रकारांशी बोलतानाल डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, "मला संपूर्ण इराण उद्ध्वस्त करायचा नाही, पण गरज पडल्यास मला ते करावं लागेल, तुम्हाला लवकरच समजेल". याशिवाय, इराणच्या अणु कार्यक्रमाबाबत ते म्हणाले, "ते आमच्या मंजुरीशिवाय काहीही करत नाहीत."

गेल्या आठ महिन्यांपासून इराण युद्ध चालू आहे. इस्रायलने अमेरिकेच्या मदतीने हे युद्ध छेडले. मात्र, या युद्धाचा परिणाम अमेरिका आणि इस्रायलच्या दोन्ही सत्तांवर झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मध्यावधी निवडणुकीत पराभवाची धूळ चाखावी लागली. रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांना काँग्रेसच्या प्रतिनिधिगृह आणि सिनेट या दोन्ही सभागृहांमध्ये हार पत्करावी लागली आहे. तर, डेमोक्रॅटिक पक्षाने काँग्रेसमध्ये सत्तांतर घडवून आणलं आहे.

तसंच, दुसरीकडे इस्रायलमध्ये पंतप्रधान बिन्यामिन नेतन्याहू यांचीही खुर्ची धोक्यात आली आहे. इस्रायलमध्ये अरबांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन पक्षांनी यशर पक्षाचे नेते गाडी आयसेनकोट यांना सरकार स्थापनेसाठी पाठिंबा दिला आहे. तर अति-उजव्या पक्षांपैकी 'युनायटेड तोराह ज्युडाइझम' या पक्षाने पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांच्या लिकुड पक्षाला पाठिंबा न देता तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नेतान्याहू यांची गच्छंती निश्चित झाली असून पुन्हा पंतप्रधान होण्याचे स्वप्न धुळीला मिळाले आहे. मात्र, पुढील पंतप्रधानांचा शपथविधी होईपर्यंत ते या पदावर कायम राहतील.

दरम्यान, तेहरानने वॉशिंग्टनला मान्य असलेल्या अटींवर करारास सहमती दर्शवली नाही, तर निवडणुकीनंतर इराणवर पुन्हा मोठ्या प्रमाणावर हल्ले करण्याची धमकी ट्रम्प यांनी यापूर्वी दिली होती.



'रामायण'चा बॉक्स ऑफिसवर धमाका!

रणबीर कपूर, साई पल्लवी आणि यश यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या बहुप्रतीक्षित 'रामायण' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार सुरुवात केली आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित या चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी भारतात ६४.८५ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले आहे. 'सॅकनिल्क'च्या आकडेवारीनुसार, चित्रपटाचे इंडिया ग्रॉस कलेक्शन ७७.५० कोटी रुपये झाले आहे.

देशभरात चित्रपटाचे जवळपास २५,२०० शो आयोजित करण्यात आले होते. यामध्ये हिंदी व्हर्जनने सर्वाधिक ४७.५० कोटी रुपयांची कमाई केली. तर कन्नड ७.२५ कोटी, तेलुगू ६ कोटी, तमिळ २.६० कोटी आणि मल्याळम व्हर्जनने १.५० कोटी रुपये कमावले.

२०२६ मधील सर्वाधिक ओपनिंग मिळवणाऱ्या चित्रपटांच्या यादीत 'धुरंधर: द रिव्हेंज'नंतर 'रामायण' दुसऱ्या क्रमांकावर आहे. 'धुरंधर: द रिव्हेंज'ने पहिल्या दिवशी १०२.५५ कोटींची कमाई केली होती. तसेच 'रामायण'ने 'पठाण' आणि 'ॲनिमल'च्या पहिल्या दिवसाच्या कमाईचे आकडे मागे टाकले आहेत.

शनायाची नवी इनिंग!



स्टुडंट ऑफ द ईयरच्या मागील चित्रपटांमध्ये कॉलेज लाइफ, मैत्री, प्रेम, आकर्षक पार्टी आणि ग्लॅमरची झलक दिसून आली होती. परंतु 'स्टुडंट ऑफ द ईयर : आफ्टर डार्क'मध्ये कहाणीचा वेगळा अंदाज दिसून येणार आहे. यावेळी कहाणी मोठ्या पडद्यावर नव्हे तर वेबसीरिजद्वारे दाखविण्यात येणार आहे. या सीरिजमध्ये ग्लॅमर आणि कॉलेज लाइफसोबत एक डार्क कहाणीही पहायला मिळेल. निर्मात्यांनी या सीरिजची घोषणा केली आहे. याचे नाव 'स्टुडंट ऑफ द ईयर : आफ्टर डार्क' ठेवण्यात आले आहे. तर शनाया कपूर या सीरिजद्वारे ओटीटीच्या जगतात पाऊल ठेवणार आहे. या सीरिजचा टीझर निर्मात्यांनी जारी केला आहे. सीरिजच्या टीझरच्या सुरुवातीला पार्टी अन् मस्तीने भरलेले जग दिसते. परंतु लवकरच कहाणी नवे वळण घेते आणि एका युवतीचा मृतदेह दिसून येतो. टीझरचे हे दृश्य यावेळी कहाणीत रहस्य, रोमांच आणि अनेक अनुत्तरित प्रश्न पहायला मिळू शकतात हे दर्शवितो. या वेबसीरिजची निर्मिती करण जौहर करणार आहे. तर दिग्दर्शन रीमा माया करणार आहे. सध्या या सीरिजच्या प्रदर्शनाची तारीख आणि उर्वरित कलाकारांची माहिती समोर आलेली नाही.



6 वर्षांनंतर बिपाशाचं कमबॅक!

एकेकाळी बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री म्हणून बिपाशा बासूला ओळखले जात होते. परंतु चित्रपटसृष्टीपासून अंतर राखल्यामुळे बिपाशा प्रसिद्धीच्या झोतापासून गायब झाली होती. पण सुमारे 6 वर्षांच्या प्रतीक्षेनंतर बिपाशा अभिनयाच्या क्षेत्रात परतणार आहे. तिने एका दिग्दर्शकासोबत पुढील प्रोजेक्टसाठी हातमिळवणी केली आहे. बिपाशा यापूर्वी 2020 मध्ये डेंजरस या सीरिजमध्ये दिसून आली होती. यानंतर 2022 मध्ये बिपाशाने मुलीला जन्म दिला होता आणि तेव्हापासून ती स्वत:च्या लाडक्या मुलीच्या पालनपोषणात व्यग्र राहिली आहे. आता अभिनयाच्या क्षेत्रात ती एका सीरिजद्वारे पुनरागमन करणार आहे. बिपाशाने हंसल मेहता यांच्या वेबसीरिजमध्ये काम करण्याचा निर्णय घेतला आहे. या सीरिजमध्ये तिच्यासोबत विशाल जेठवा आणि सनी कौशलदेखील महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहे. बिपाशाची ही वेबसीजि प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. तर मोठ्या पडद्यावर बिपाशा सुमारे 11 वर्षांपासून दिसून आलेली नाही. तिचा अखेरचा प्रदर्शित चित्रपट अलोन होता, जो 2011 मध्ये झळकला होता. बिपाशाची आगामी सीरिज सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी आलोक लाल यांच्याकडून लिखित पुस्तक 'द बाराबंकी नार्कोस : बस्टिंग इंडियाज मोस्ट नोटोरियस ड्रग कार्टेल"वर प्रेरित असणार आहे. यात 1984 च्या अमली पदार्थांच्या तसकरीशी निगडित घटनाक्रमाला दाखविले जाऊ शकते.

वैभव सूर्यवंशीकडे बिहारचे कर्णधारपद

इंदूर येथे होणाऱ्या या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात १४ नोव्हेंबर रोजी बिहारची गाठ सौराष्ट्रशी

महाईन्यूज । पाटणा

भारताचा उदयोन्मुख युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याच्याकडे २०२६-२७ च्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेतील पहिल्या दोन सामन्यांसाठी बिहार संघाच्या कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. बिहार क्रिकेट असोसिएशनने (बीसीए) शुक्रवारी या प्रतिष्ठेच्या टी-२० स्पर्धेसाठी १७ सदस्यीय संघाची घोषणा केली असून, अवघ्या १५ व्या वर्षी वैभव बिहारचे नेतृत्व करणार आहे.



इंदूर येथे होणाऱ्या या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात १४ नोव्हेंबर रोजी बिहारची गाठ सौराष्ट्रशी पडणार असून, १६ नोव्हेंबर रोजी रेल्वेविरुद्ध दुसरा सामना रंगणार आहे. या दोन्ही सामन्यांत वैभव संघाचे नेतृत्व करेल, तर सूरज कश्यपची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.

वैभव सूर्यवंशीसाठी चालू वर्षातील ही पहिलीच नेतृत्व जबाबदारी नाही. याआधी २०२६-२७ च्या दुलीप ट्रॉफी स्पर्धेत पूर्व विभागाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी त्याच्यावर सोपवण्यात आली होती. त्यावेळी तो इशान किशनचा उपकर्णधार म्हणून कार्यरत होता. मध्य विभागाविरुद्धच्या उपांत्य फेरीत किशन मनगटाच्या दुखापतीमुळे मैदानाबाहेर गेल्यानंतर वैभवला संघाचे नेतृत्व करण्याची सुवर्णसंधी मिळाली होती. चेन्नई येथे दक्षिण विभागाविरुद्ध झालेली अंतिम लढत अनिर्णित सुटली असली, तरी पहिल्या डावातील तब्बल ३७२ धावांच्या भक्कम आघाडीच्या जोरावर पूर्व विभागाने विजेतेपदावर आपले नाव कोरले होते.

बिहार क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष हर्षवर्धन यांनी या निवडीचे स्वागत करताना सांगितले की, ही जबाबदारी वैभवला एक क्रिकेटपटू आणि सक्षम कर्णधार म्हणून अधिक प्रगल्भ होण्याची संधी देईल. वैभवने इतक्या लहान वयातच अफाट प्रतिभा, आत्मविश्वास आणि परिपक्वतेचे दर्शन घडवले आहे. आगामी हंगामात बिहारचे प्रतिनिधित्व करताना वैभवच्या नेतृत्वाखाली संघ शिस्तबद्ध, स्पर्धात्मक आणि प्रभावी कामगिरी करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डावखुरा फलंदाज असलेल्या वैभवसाठी २०२६ हे वर्ष स्वप्नवत ठरले आहे. १९ वर्षांखालील गटात आपल्या कौशल्याची चुणूक दाखवल्यानंतर त्याने इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये धडाकेबाज कामगिरी करत थेट भारतीय वरिष्ठ संघात स्थान मिळवले. २०२६ च्या १९ वर्षाखालील पुरुषांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताला विजेतेपद मिळवून देण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली होती. इंग्लंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याने साकारलेली १७५ धावांची वादळी खेळी आणि स्पर्धेतील मालिकावीर पुरस्कार विशेष लक्षवेधी ठरला. त्यानंतर आयपीएल २०२६ मध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळताना त्याने २३७.३० च्या अद्भूत स्ट्राईक रेटने तब्बल ७७६ धावा कुटत संघाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होण्याचा मान पटकावला.

वैभव - अभिषेकची ऐतिहासिक भागीदारी

या नेत्रदीपक कामगिरीच्या जोरावर त्याला भारताच्या टी-२० संघात पाचारण करण्यात आले. मँचेस्टर येथे इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यातून त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि भारताचा सर्वात तरुण पुरुष आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू ठरण्याचा बहुमान मिळवला. नुकत्याच झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात वैभवने अभिषेक शर्मासह पहिल्या सहा षटकांत बिनबाद ११८ धावांची ऐतिहासिक भागीदारी केली. आंतरराष्ट्रीय पुरुष टी-२० क्रिकेटच्या पॉवरप्लेमधील ही आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. दरम्यान, अष्टपैलू खेळाडू मंगल महूर आणि वेगवान गोलंदाज साकिब हुसेन यांचा संघात समावेश त्यांच्या फिटनेसवर अवलंबून असेल. पहिल्या दोन सामन्यांनंतर त्यांच्या तंदुरुस्तीचा आढावा घेऊन त्यांच्या सहभागाबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

दुसऱ्या वन-डेवर पावसाचे सावट, विराटपाठोपाठ रोहितही बहरात येण्याची अपेक्षा

महाईन्यूज । वेलिंग्टन

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात आज (दि. ७) होणाऱ्या दुसऱ्या वन-डे सामन्यात खराब हवामान, पावसाचा व्यत्यय येण्याची शक्यता स्थानिक हवामान खात्याने नोंदवली आहे. सामना होऊ शकल्यास भारताची गोलंदाजीतील भिस्त पुन्हा एकदा गुरनूर ब्रार, अंशुल कंबोज आणि अर्शदीप सिंग या अननुभवी त्रिकुटावर असेल. याशिवाय, फलंदाजीत विराटपाठोपाठ रोहित शर्मानेही बहरात येणे अपेक्षित असणार आहे.



ॲकुवेदरच्या हवामान अंदाजानुसार, शनिवारी दुपारी वेलिंग्टनमध्ये ढगाळ वातावरण राहून हलक्या पावासाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे, तर संध्याकाळच्या सुमारास वातावरण अंशतः ढगाळ राहून हलका पाऊस पडू शकतो. यापूर्वी पहिल्या वन-डेत भारताच्या गोलंदाजीच्या ताकदीबाबत अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते; परंतु पहिल्या सामन्यातील अप्रतिम कामगिरीच्या जोरावर गुरनूर, अंशुल कंबोज आणि अर्शदीप या त्रिकुटाने ते चित्र पूर्णपणे बदलून टाकले. या गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीवरून आतापर्यंत अष्टपैलू खेळाडूंना प्राधान्य देणाऱ्या मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या धोरणातही काहीसा बदल होत असल्याचे संकेत मिळत आहेत. 'हेन्री स्टेडियम'वरील या महत्त्वपूर्ण सामन्यात खराब हवामानाचा व्यत्यय येण्याची शक्यता असल्याने याबाबत मात्र क्रिकेटप्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण आहे. प्रतिकूल हवामानामुळे भारताचे शुक्रवारी बेसिन रिझर्व्ह येथील नियोजित सराव सत्र रद्द करण्यात आले, तर न्यूझीलंडच्या संघाने इनडोअर सुविधेत सराव केला.

सामन्यापूर्वी न्यूझीलंडचा प्रमुख फलंदाज डेव्हन कॉनवे हा सराव सत्रादरम्यान झालेल्या क्षेत्ररक्षणातील एका दुर्दैवी धडकेत मेंदूला झालेल्या दुखापतीमुळे (कन्कशन) संपूर्ण मालिकेतून बाहेर पडला आहे. आधीच व्यस्त वेळापत्रक आणि खेळाडूंच्या दुखापतींशी सामना करणाऱ्या किवी संघासाठी हा एक मोठा धक्का आहे. दरम्यान, या घटनेत सामील असलेला दुसरा खेळाडू मॅट हेन्री पूर्णपणे बरा झाला असून, तो या सामन्यासाठी उपलब्ध असेल. ऑकलंडमधील ईडन पार्क मैदानावर सरळ सीमा (स्ट्रेट बाऊंड्रीज) लहान होत्या; मात्र वेलिंग्टनमधील 'हेन्री स्टेडियम'वर चौकार-षटकारांच्या सीमा (स्क्वेअर बाऊंड्रीज) तुलनेने लहान असल्यामुळे वेगवान गोलंदाजांना आपल्या टप्प्यात त्यानुसार योग्य ते बदल करावे लागतील.

मालिकेची पार्श्वभूमी

ऑकलंड येथे खेळला गेलेला पहिला वन-डे सामना पावसामुळे बाधित झाल्याने ३२ षटकांचा करण्यात आला होता, यामध्ये भारताने ५ गडी राखून विजय मिळवत पाच सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या मालिकेतील तिसरा सामना १० नोव्हेंबर रोजी हॅमिल्टन येथे खेळवला जाईल, तर शेवटचे दोन सामने १३ आणि १५ नोव्हेंबर रोजी माऊंट माऊंगानुई येथे पार पडतील. त्यानंतर १९ नोव्हेंबरपासून बेसिन रिझर्व्ह येथे दोन सामन्यांची कसोटी मालिका सुरू होईल.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।
दि. 07 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



जनसेवेच्या नव्या पर्वाला प्रारंभ!

डॉ. सुहास कांबळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी, सर्वसामान्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि प्रभागाच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे प्रभाग क्रमांक ८ मधील नगरसेवक डॉ. सुहास लक्ष्मण कांबळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा मोठ्या आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला. इंद्रायणीनगर, भोसरी येथील 'अन्नपूर्णा' इमारतीमध्ये सुरू करण्यात आलेल्या या जनसंपर्क कार्यालयामुळे परिसरातील नागरिकांसाठी लोकप्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याचे एक महत्त्वपूर्ण केंद्र उपलब्ध झाले आहे.

या उद्घाटन सोहळ्यात भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. जनतेचा विश्वास हीच लोकप्रतिनिधींची खरी ताकद असून, त्या विश्वासाला विकासकामांच्या माध्यमातून न्याय देण्याचा निर्धार या प्रसंगी अधोरेखित झाला. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या उद्घाटन सोहळ्यामुळे प्रभाग क्रमांक ८ मध्ये जनसेवेच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली असून, नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासाचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्याच्या दिशेने हे जनसंपर्क कार्यालय महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी केले, तर भाजपा कामगार मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विजय आण्णा चौधरी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे संयोजन उज्ज्वला कांबळे, डॉ. राज कांबळे, डॉ. समृद्धी कांबळे, डॉ. रावसाहेब पोटे, संदिप लोखंडे, अशोक मोरे आणि गिरीश वाघमारे यांनी केले.

जनसंपर्क कार्यालय हे केवळ लोकप्रतिनिधींचे कार्यालय न राहता नागरिकांच्या अडचणी, समस्या, सूचना आणि अपेक्षा मांडण्याचे प्रभावी केंद्र व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. परिसरातील पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, स्वच्छता, पायाभूत सुविधा, नागरी सोयी-सुविधा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी या कार्यालयाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

यावेळी नगरसेविका नम्रता लोंढे, नगरसेवक योगेश लांडगे, नगरसेवक प्रविण भालेकर, प्रतापराव मोहिते मामा, निलम लांडगे, शिवराज लांडगे, संदिपान झोंबाडे, अशोक आहेर, अनिल सौंदाडे, प्रमोद राणे, संतोष निर्सगंध, चंद्रकांत रासकर, अजहर खान, प्रा. बी. बी. शिंदे, भाऊसाहेब डोळस, गोकुळ गायकवाड, विनोद अहिरे, प्रा. संजीव सूर्यवंशी, डॉ. अनू गायकवाड, डॉ. विश्वजीत गायकवाड, नितीन भोसले, प्रशांत लांडगे, कुंदन काळे, सागर भोसले, महादेव गोमे, अशोक सज्जनशेट्टी, संतोष वरे, संदिप लोखंडे, साई वाघमारे, हरीष शिंदे, बाबुराव लोंढे, संदिप कुंभार, पंकज पवार, ॲड. अतुल कांबळे आणि बाबाजी कळमकर यांच्यासह प्रभाग क्रमांक ८ मधील विविध सेक्टरमधील सोसायटीचे चेअरमन, पदाधिकारी व सभासद तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जनतेच्या सेवेसाठी जनसंपर्क कार्यालय २४×७ उपलब्ध

यावेळी मनोगत व्यक्त करताना नगरसेवक डॉ. सुहास कांबळे म्हणाले, "हे जनसंपर्क कार्यालय सर्व नागरिकांसाठी २४×७ सदैव उपलब्ध राहणार आहे. नागरिकांची कोणतीही अडीअडचण असो, त्यावर मार्ग काढण्यासाठी आणि ती सोडविण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहणार आहोत. आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. नागरिकांनी आपल्या समस्या, सूचना आणि अपेक्षा या कार्यालयाच्या माध्यमातून आमच्यापर्यंत पोहोचवाव्यात. जनतेचा विश्वास आणि सहकार्याच्या बळावर प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणे, हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे."

सुशिक्षित आणि प्रोफेशनल व्यक्तींनी राजकारणात यावे

यावेळी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करताना आमदार महेश लांडगे यांनी डॉ. सुहास कांबळे यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, "सुशिक्षित आणि सामाजिक दृष्टिकोन असणाऱ्या व्यक्तींनी राजकारणात येणे ही काळाची गरज आहे. अशा व्यक्तींमुळे नागरिकांच्या समस्या अधिक अभ्यासपूर्ण पद्धतीने समजून घेऊन त्या सोडविण्यास मदत होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नगरसेवक डॉ. सुहास कांबळे. त्यांनी लोकसेवेच्या उद्देशाने सुरू केलेले हे जनसंपर्क कार्यालय नागरिकांसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांच्या अडीअडचणी सोडविणे अधिक सोपे होणार असून, त्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत."

वसुबारसनिमित्त गोवत्स पूजन; प्रभाग क्र. १९ मध्ये रोहित गोलांडे सोशल वेल्फेअरतर्फे उपक्रम

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

भारतीय संस्कृतीतील परंपरा, श्रद्धा आणि गोमातेप्रती असलेली कृतज्ञता जपण्याच्या उद्देशाने वसुबारसच्या पवित्र सणानिमित्त शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. 'रोहित गोलांडे सोशल वेल्फेअर'च्या वतीने प्रभाग क्रमांक १९ मधील विविध १० ठिकाणी गोवत्स पूजनाचा अत्यंत सुंदर उपक्रम उत्साहात पार पडला.



या विशेष कार्यक्रमांतर्गत प्रभागातील १० वेगवेगळ्या ठिकाणी गोमातेचे दर्शन घेऊन पूजन करण्यात आले. यावेळी रोहित गोलांडे यांनी स्वतः सर्व ठीकाणी उपस्थित राहून गोमातेचे विधिवत पूजन केले तसेच स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. या प्रसंगी नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

गोमाता ही भारतीय संस्कृतीचा आणि जीवनशैलीचा कणा मानली जाते. वसुबारसनिमित्त आयोजित या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना आपल्या संस्कृतीची आठवण करून देत, गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या संवादफेरीत उपस्थितांशी संवाद साधताना सर्वांना दिपोत्सव व दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

"सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंद नांदो," अशी सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आली. या उपक्रमामुळे प्रभागात वसुबारसचा सण अत्यंत चैतन्यमय आणि आनंददायी वातावरणात साजरा झाला.


आरकेएल गॅलेक्सी स्कूलमध्ये दिवाळी दणदणीत

चिमुकल्यांच्या हातांनी सजवले वर्ग विद्यार्थ्यांनी साकारली दिव्याची भव्य मानवी आकृती

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल, वडमुखवाडी येथे ५ नोव्हेंबर २०२६ रोजी दिवाळी उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक जल्लोषात साजरा करण्यात आला. या उत्सवाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही कृत्रिम सजावट न वापरता, संपूर्ण सजावट विद्यार्थ्यांनी स्वतः आपल्या हातांनी (Handmade) केली होती.





मानवी 'दिवा' ठरला मुख्य आकर्षण

या संपूर्ण महोत्सवातील सर्वात लक्षवेधी क्षण ठरला तो म्हणजे, शाळेच्या मैदानावर इयत्ता १ ली आणि २ रीच्या विद्यार्थ्यांनी साकारलेला दिव्याचा भव्य आकार (Diya Formation). चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने एकत्र येत दिव्याची मानवी आकृती तयार केली. या अनोख्या कल्पनेने उपस्थित सर्वांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाचे आयोजन नर्सरी ते २ आणि ३ ते १० अशा तीन गटांमध्ये करण्यात आले होते. या गटांमधील विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गांची आणि मजल्यांची अत्यंत आकर्षक सजावट करत संपूर्ण परिसर दिवाळीमय करून सोडला.

दिवाळी सेलिब्रेशनमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले सुंदर आकाशकंदील, पानांची तोरणे, पारंपरिक रांगोळ्या आणि विविध आकर्षक कलाकृतींद्वारे शाळा सजवली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील कलागुण, टीमवर्क, सर्जनशीलता आणि एकतेचे सुंदर दर्शन घडले.

हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्राचार्य श्री. जोतिबा सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समन्वयक आणि शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व उत्साहाने शाळेतील दिवाळी साजरीकरणाची ही बातमी संपूर्ण परिसरात कौतुकाचा विषय ठरली आहे.

> "आम्ही केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला (CREATIVITY) आणि उपजत कलागुणांना प्रोत्साहन देण्यावर नेहमीच प्राधान्य देतो. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी केलेली वर्गसजावट आणि चिमुकल्यांनी मैदानावर साकारलेली दिव्याची मानवी आकृती हे त्यांच्यातील एकात्मता, सांघिक भावना (TEAMWORK) आणि कल्पकतेचे उत्तम उदाहरण आहे. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये भारतीय संस्कृतीची गोडी निर्माण होण्यासोबतच आत्मविश्वास वाढीस लागतो. दिवाळी उत्सवाच्या या सुंदर सोहळ्यात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो."
>
> **- डॉ. पुष्कर चोबे, मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल.**

Dr. D. Y. Patil Technical Campus Celebrates Diwali with Grandeur, Culture and Festive Spirit

Mahaenews । PIMPRI-CHINCHWAD

The campus was beautifully illuminated and filled with festive energy as the celebration brought together the entire campus community to mark the auspicious occasion. The event featured a series of vibrant cultural performances showcasing the rich traditions, artistic talents and festive spirit of students and participants.



A special highlight of the celebration was the traditional Diya Lighting Ceremony, symbolising the triumph of light over darkness, knowledge over ignorance and hope over despair. The festivities concluded on a joyful note with a spectacular display of firecrackers, adding sparkle and excitement to the occasion.

The presence and encouragement of the dignitaries made the celebration even more memorable. The event reflected the institution's commitment to fostering cultural values, unity, togetherness and a sense of belonging among its members.

The Diwali celebration concluded with happiness, enthusiasm and festive cheer, spreading the message of positivity, prosperity and new beginnings across the campus.

Dr. D. Y. Patil Varale Campus Celebrates Diwali with Great Enthusiasm and Festive Spirit

Mahaenews । PIMPRI-CHINCHWAD

Dr. D. Y. Patil Varale Campus celebrated the festival of lights, Diwali, with immense joy, enthusiasm, and traditional fervour, creating an atmosphere of happiness, cultural vibrancy, and togetherness across the campus.



The celebration was graced by the presence of President Dr. Sushant Patil, Director Dr. Meghna Bhillare, Director Mr. Suresh Mali, Cultural Director Prof. Shreyas Deshpande, Heads of Departments, distinguished dignitaries, faculty members, and staff.

The campus witnessed a series of vibrant cultural performances that added colour and excitement to the festive occasion. The traditional lighting of diyas symbolised the victory of light over darkness and good over evil. The celebration was further enhanced by the distribution of gifts, spreading happiness and strengthening the spirit of sharing and togetherness among everyone present. The event provided an opportunity for the campus community to come together and celebrate the festival beyond cultural boundaries, fostering unity, positivity, and a sense of belonging.

The Diwali celebration concluded on a joyful note, leaving behind cherished memories and festive moments for all.

Dr. D. Y. Patil Varale Campus extends heartfelt wishes to everyone for a Happy, Safe, and Prosperous Diwali.

आरएमसी प्लांटमुळे १० हजार नागरिकांच्या आरोग्याला धोका

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

सिंहगड रस्त्यावरील वडगाव खुर्द परिसरात कोणत्याही आवश्यक परवानग्या न घेता सुरू असलेल्या रेडीमिक्स काँक्रिट (आरएमसी) प्लांटमुळे सुमारे दहा हजार नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, बावधन आणि धायरी येथील अनधिकृत आरएमसी प्लांटवर कारवाई करणाऱ्या महापालिका प्रशासन, वडगाव खुर्दमधील प्लांटवर कारवाई का करत नाही, कारण या प्रकल्पांना राजकीय अभय आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. भाऊसाहेब आजबे यांनी केला आहे. याबाबत आजबे यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन या प्लांटवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

वडगाव खु. मधील वडजाई माता मंदिराजवळील चार आरएमसी प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांना आवश्यक परवानग्या नाहीत. विशेषतः महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) या प्रकल्पांना परवानगी नाकारली आहे. या प्लांटमधून दिवसरात्र वाहतूक सुरू असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर धूळ आणि ध्वनिप्रदूषण होत आहे. प्रयेजा सिटी, प्रयेजा पुरम, प्रयेजा पर्ल, मधुकोश, आर्य रेसिडेन्सी, कल्पवृक्ष, अक्वा रेसिडेन्सी आणि सुंदर संस्कृती यांसह विविध सोसायट्यांमधील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनाही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. रहिवाशांना श्वसनाचे विकार, खोकला, दम्याच्या तक्रारी आणि डोळ्यांची जळजळ अशा आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या परिसरातील रहिवासी आणि सोसायट्यांच्या संघटनांनी यापूर्वीच महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदने, वैद्यकीय अहवाल आणि अन्य कागदपत्रे सादर केली आहेत. मात्र, कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. बावधन आणि धायरीतील अनधिकृत प्लांटवर कारवाई झाली असताना वडगाव खुर्दमधील प्लांटवर कारवाई टाळली जात आहे.

यातील प्रकल्प स्थानिक आमदाराच्या मुलांच्या मालकीचा असल्याने प्रशासनावर राजकीय दबाव टाकला जात आहे, त्यामुळे येथे कारवाई होत नसल्याचा आरोपही आजबे यांनी केला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता संबंधित आरएमसी प्लांटवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आजबे यांनी केली आहे.

